


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे | * अंक २२९ | * नांदेड | * मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५ | * पृष्ठे १० | * किंमत २ रुपये | ☎ : 255777, Fax :252211





स्मृती सोहळा
वसंत स्मृती सोहळा
पुर्णाकृती पुतळा अनावरण
वसंतगाथा
स्मृतीग्रंथ प्रकाशन सोहळा
स्व.आ.बळवंतरावजी पा.चव्हाण व
स्व.खा.वसंतरावजी पाटील चव्हाण
यांच्या पावन स्मृतीस
विनम्र अभिवादन
मंगळवार दि.२६ ऑगस्ट-२०२५
सकाळी ११ वा.
स्थळ-श्री हनुमान मंदिर,परिसर,
नायगांव (बा.)
अभिवादक
समस्त बेटमोगरेकर पा.परिवार

# स्व.आ.बळवंतराव चव्हाण व स्व.खा.वसंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांचे आज अनावरण

## मान्यवरांच्या स्वागतासाठी नायगाव नगरी सज्ज



**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव येथे आज दि. २६ ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या हस्ते होणाऱ्या स्व.आ.बळवंतराव चव्हाण व स्व.खा. वसंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याची तयारी पूर्ण झाली आहे. या सोहळ्यासाठी येणाऱ्या मान्यवरांच्या स्वागतासाठी नायगाव नगरी सज्ज झाली आहे.

मंगळवार, दि. २६ ऑगस्ट रोजी नायगाव बाजार येथील श्री हनुमान मंदिर परिसरात सकाळी ११ वाजता होणाऱ्या या सोहळ्यासाठी माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खा.छत्रपती शाहु महाराज आदी मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे. तसेच माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह पालकमंत्री अतुल सावे, ना. राधाकृष्ण विखे पाटील, ना.बाबासाहेब पाटील, ना.मेघना बोर्डीकर, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, बाळासाहेब थोरात, माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम, नाना पटोले, माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांता पाटील, माणिकराव ठाकरे, जयंत पाटील, आ.हेमंत पाटील, माजी मंत्री डी.पी.सावंत, अर्जून खोतकर, माजी मंत्री अब्दुल सत्तार, खा.रजनीताई पाटील, विजय वडेट्टीवार, भास्करराव पाटील खतगावकर, अमित देशमुख, वर्षाताई गायकवाड, सतेज पाटील, विश्वजित कदम, चंद्रकांत हंडोरे, प्रज्ञाताई सातव, ईश्वरराव भोसीकर, खा.सुरेश शेटकर, खा.किरण रेड्डी, खा.कल्याणराव काळे, खा.नागेश पाटील आष्टीकर, खा.शिवाजीराव काळगे, खा. प्रतिभाताई धानोरकर, खा.डॉ.अजित गोपछडे, खा. अमोल कोल्हे, खा.प्रणिती शिंदे, खा. शोभाताई बच्छाव, खा.डॉ.नामदेव किरसन, खा.बलवंत वानखेडे, खा.श्यामकुमार बर्वे, खा.प्रशांत पडोले, खा.इमरान प्रतापगढी, खा.अमर काळे, खा.बजरंग सोनवणे, खा.संदीपानराव भुमरे आदींसह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

सभास्थळी भव्य मंडप उभारण्यात आला असून वाहनतळ, विशेष सुरक्षा व्यवस्थेसह इतर सर्व आवश्यक त्या सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. सोहळा यशस्वीतेसाठी गेल्या अनेक दिवसांपासून असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

सोहळ्यानिमित्त हनुमान मंदिर परिसरात दुपारी १ ते संध्याकाळी ६ या वेळेत सर्व उपस्थितांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानंतर रात्री ८ ते ११ या वेळेत हभप पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा) यांचे कीर्तन होणार असून, परिसर भक्तीमय वातावरणाने निनादणार आहे. कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक, शेतकरी, युवक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन खासदार रवींद्र चव्हाण व चव्हाण कुटुंबियांच्यावतीने करण्यात आले आहे.



**नांदेड :** उद्यापासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवासाठी बाजारपेठ फुलली असून बाजारपेठेत गणेश मुती, सजावटीचे व पुजेचे साहित्य खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. (छाया : करणसिंह बैस)

# लोहा तालुक्यातील वन जमिनीवर अतिक्रमण; दोन आरोपींविरुद्ध वन कायद्यान्वये कारवाई

## वन विभागाकडून बैल जोडीसह नांगर ताब्यात

**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील रिसनगाव शिवारात वन विभागाची एकूण ३५० हेक्टर वन जमीन आहे. सदरील जमिनीवर गावातील दोघे अतिक्रमण करून शेत कसत असल्याचे आढळून आल्याने वन विभागाकडून सदर दोन व्यक्तींविरुद्ध वन कायदा अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अतिक्रमण धारकांचे लोखंडी नगरांसह बैलजोडी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली आहे.

वन विभागाच्यावतीने मागील आठवड्यात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील बैठकीत आ. चिखलीकर यांनी वन जमीन संदर्भात सर्व आढावा घेऊन सदर वन जमिनीवर निसर्ग पर्यटन करण्याच्या सूचना देऊन त्यासाठी सर्वोतोपरी मदत, सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. रिसनगाव शिवारात वन विभागाची जवळपास ३५० हेक्टर शेत जमीन असून सदरील जमिनीवर आनंदवन, आंब्रबन, जांभुळबन, फुलबाग आदी विविध फळ, फुलांची लागवड करून परिसरात आनंदवन निर्माण करण्याच्या सूचना आ. चिखलीकर यांनी दिल्या होत्या. मात्र सदरील वन कक्ष क्र. ५६३ अंतर्गत सर्व्हे नं. ६५७ मध्ये काही मंडळींकडून अतिक्रमण केल्याचे दिसून आले. वनरक्षक विकास घुमे यांनी सर्व परिस्थितीची पाहणी व पंचनामा करून गावातील दोन आरोपींविरूद्ध भारतीय वन अधिनियम कलम १९२७ चे कलम २६ (१) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

सदर कारवाई वनविभागीय अधिकारी उपवनसंरक्षक केशव बाबळे, वनसंरक्षक भारत खेलबाडे, वन परिक्षेत्र अधिकारी अनिल रासने, वनपीरमंडळ अधिकारी ज्ञानेश्वर हाळदळे, मंडळाचे वनरक्षक विकास घुमे यांनी पार पाडली.

# नांदेडसह लातूर, हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख काँग्रेस पदाधिकाऱ्यांची आज आढावा बैठक

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह अनेक नेत्यांची असणार उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत नांदेड, लातूर, हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख काँग्रेस पदाधिकाऱ्यांची जिल्हानिहाय आढावा बैठक आज मंगळवार, दि.२६ रोजी शहरातील नक्षत्र बँकेट हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती खा. रवींद्र चव्हाण यांच्यासह दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने नांदेडसह लातूर, हिंगोली या तीन जिल्ह्यांतील प्रमुख काँग्रेस पदाधिकाऱ्यांची जिल्हानिहाय आढावा बैठक आज नक्षत्र बँकेट हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे. यात दुपारी तीन ते चार वाजेदरम्यान लातूर, चार ते पाच वाजेदरम्यान हिंगोली, पाच ते सहा वाजेदरम्यान नांदेड जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची जिल्हानिहाय आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषद गटनेते सतेज पाटील, माजी बाळासाहेब थोरात, माजी मंत्री अमित देशमुख, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी कार्यकारिणी सदस्या श्रीमती रजनी पाटील, सहप्रभारी कुणाल चौधरी, खा. डॉ. कल्याणराव काळे, खा. शिवाजीराव काळगे, खा रविंद्र चव्हाण आदींची विशेष उपस्थिती असणार आहे. अशी माहिती खा. रवींद्र चव्हाण यांच्यासह दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

# आकर्षक गणपती मुर्तींनी बाजारपेठ सजली



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** उद्या गणपती बाप्पाचे आगमन होणार असून बाजारपेठ बाप्पांच्या मुर्तींनी सजली आहे. सिडको–हडको भागात ग्राहकांनी या मुर्ती खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे.

ग्रामीण भागातील धनेगाव येथील मुर्तीकार गोविंद लक्ष्मण चिलोरे यांनी आकर्षक अशा गणपती मुर्ती तयार करून विक्रीसाठी आणल्या असून ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे.

दि. २७ ऑगस्ट रोजी गणेशोत्सवाला प्रारंभ होणार आहे. यानिमित्ताने शहरातील बाजारपेठ सजली आहे. सिडको बाजारपेठ देखील सजली असून या बाजारपेठेत मुर्तीकार गोविंद लक्ष्मण चिलोरे यांच्या मुर्त्यांना विशेष मागणी आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून चिलोरे हे आकर्षक मुर्त्या बनविण्याचे काम करीत आहेत. यात लालबाग राजा, दगडुशेठ, नटराज, यासह डमरूवर विराजमान, गायी सोबत, गादीवर अश्वारूढ यासह विविध आकारातील अनेक आकर्षक व सुबक डिझाईनमध्ये गणपती मुर्ती तयार केल्या आहेत. या गणेश मुर्त्यांना मागणी वाढली आहे.सिडको हडको परिसरातील अनेक ठिकाणी महादेव पिंपळगाव, उमरखेड, सातेफल, हदगाव या ठिकाणावरून अनेक विक्रेते यांनीही गणेश मुर्ती विक्रीसाठी उपलब्ध केल्या आहेत. छत्रपती शिवाजी चौक, सिडको व हडको सह विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात गणेश मुर्ती उपलब्ध झाल्या असून ग्राहकांनी खरेदीसाठी गर्दी केली आहे.




रामबान ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308







**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com


स्व.आ.बळवंतरावजी पा.चव्हाण व
स्व.खा.वसंतरावजी पाटील चव्हाण
यांचा
पूर्णाकृती पुतळा अनावरण सोहळा
विनम्र अभिवादन!
॥ स्मृती सोहळा ॥
:: अभिवादनकर्ते ::
डॉ.दिनेश निखाते
प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी तथा
कार्याध्यक्ष, नांदेड शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# आत्मनिर्भर भारत होण्यातील अडथळे

जगातील राजकीय व आर्थिक वातावरण आज अत्यंत अस्थिर झालेले आहे. अशा काळात भारताने स्वतःच्या मूळ सामर्थ्यांवर विश्वास ठेवून, आत्मनिर्भरतेच्या मार्गाने प्रगती साधण्याची आवश्यकता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात याच विचाराला अधोरेखित करताना आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर भर दिला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे जागतिक व्यापार व्यवस्थेत निर्माण झालेली अनिश्चितता ही त्यामागील पार्श्वभूमी होती. पण मोदींच्या भाषणाचा गाभा हा केवळ तात्कालिक धक्क्यांना प्रतिसाद देणारा नव्हता, तर दीर्घकालीन विकासमूल्ये आणि आत्मनिर्भरतेवर आधारित व्यापक दृष्टीकोन व्यक्त करणारा होता. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध देश आहे, परंतु त्यांचा कार्यक्षम उपयोग अद्याप झाला नाही. अन्नसुरक्षेत आपण सक्षम असलो तरी ८८ टक्के कच्चे तेल आणि सुमारे ९० टक्के सेमीकंडक्टर व 'रेअर अर्थ' खनिजांबाबत परावलंबित्व अजूनही आहे. हे चित्र बदलायचे असेल, तर उद्योग, शेती, ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये समन्वित धोरण राबवणे अनिवार्य ठरते. युवा शक्ती हे भारताचे मोठे भांडवल आहे. दरवर्षी कोट्यवधी युवक रोजगाराच्या बाजारात प्रवेश करत आहेत. त्यांच्यासाठी कौशल्यविकास, शिक्षण आणि संधी यांचा मेळ घालणे ही खरी आत्मनिर्भरतेची किल्ली आहे. विकसित भारत रोजगार योजनांसारख्या उपक्रमांद्वारे तरुणांना खाजगी क्षेत्रात संधी देण्याचा प्रयत्न होत आहे. पण रोजगारनिर्मिती ही केवळ आकड्यांपुरती न राहता टिकाऊ व कौशल्याधारित असली पाहिजे. समावेशक दृष्टिकोनाशिवाय आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गाठता येणार नाही. २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याचे लक्ष्य आजमितीस दूरदर्शी भासत असले तरी ते अशक्य नाही. त्यासाठी केवळ मोठ्या गुंतवणुकीची नव्हे, तर भांडवलाचा कार्यक्षम वापर व उत्पादनक्षमता वाढवणाऱ्या सुधारणांची गरज आहे. वस्तू व सेवा करातील सुधारणा, रोजच्या जीवनातील वस्तू स्वस्त होण्याचे आश्वासन, हे फक्त उपभोग वाढवणारे नाही तर उत्पादनालाही चालना देणारे आहे. भारताची अर्थव्यवस्था तुलनेने स्थिर आहे. देशाच्या उत्पादनातील केवळ पाचवा हिस्सा बाह्य मागणीवर अवलंबून आहे. त्यामुळे जागतिक धक्क्यांपासून देशाला काही प्रमाणात संरक्षण मिळते. पण याच वेळी उदार व्यापार करार आणि बहुपक्षीय भागीदारींमधून भारताने स्वतःची उपस्थिती बळकट करणेही आवश्यक आहे. विशेषतः इंडो-पॅसिफिक प्रदेशातील व्यापक बाजारपेठेत भारताने सक्रीय सहभाग घ्यावा. ट्रान्स-पॅसिफिक भागीदारीसारख्या करारात सहभागी होणे हे जागतिक नियमाधारित व्यापार व्यवस्थेत आपली भूमिका ठळक करेल. भारतातील मूळ शक्ती म्हणजे व्यापक लोकसंख्या, अंतर्गत बाजारपेठ, अन्नसुरक्षा व स्थिर अर्थव्यवस्था. तर आव्हाने म्हणजे उर्जेसाठी परावलंबित्व, तंत्रज्ञानातील मर्यादा आणि अपुरी पायाभूत सुविधा. या आव्हानांचा सामना करण्यासाठी आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारताना खुलेपणा, समावेशकता आणि तांत्रिक प्रगती या घटकांचा संगम साधावा लागेल. आज भारताच्या हातात संधी आहे ती स्वतःच्या बलस्थानांचा उपयोग करून जागतिक मंचावर आत्मनिर्भरतेचे आदर्श उभे करण्याची. पण त्यासाठी केवळ घोषणाबाजी पुरेशी नाही. ठोस कृती, सुसंगत धोरणे, आणि सर्व घटकांचा सहभाग हाच भारताला सुरक्षित, सक्षम आणि विकसित बनवू शकेल.

# लोकशाही जपणारा निष्कलंक नेता : वसंतराव चव्हाण



लोकशाही मूल्यांवर दृढनिष्ठा ठेवून जनतेच्या सुख-दुःखात सामील होणारे एक निष्कलंक, चारित्र्यसंपन्न, गुणग्राही व लोकप्रिय राजकारणी म्हणून नांदेड लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार स्वर्गीय वसंतराव बळवंतराव चव्हाण यांची मराठवाड्यातील राजकारणात एक ठळक अशी ओळख होती. जी माणसं लोकप्रिय असतात ती पक्ष नेतृत्त्वाला प्रिय असतातच असे नाही आणि जी माणसं पक्ष नेतृत्वाला प्रिय असतात ती जनमानसात लोकप्रिय असतातच असे अजिबात नाही; परंतु तत्कालीन खासदार वसंतराव चव्हाण हे याला अपवाद होते. ते पक्षप्रिय, राजमान्य आणि लोकमान्य असे एक व्यासंगी राजकारणी होते. त्यांच्या अचानक जाण्याने मराठवाड्याचे तसेच नांदेड जिल्ह्याचे राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक नुकसान झाले आहे. सन १९७८ ते २०२४ या काळातील सरपंच ते खासदार अशा ४६ वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय प्रवासात त्यांनी लोकोत्तर कार्य केले. त्यांच्या या कार्याची आपणास ओळख व्हावी यासाठी साधलेला हा शब्दसंवाद.

मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील नायगाव येथील सदवर्तनी राजकारणी माजी आमदार स्वर्गीय बळवंतराव चव्हाण यांच्या कणखर व शिस्तप्रिय पितृछायेत त्यांची जडणघडण झाली होती. १५ ऑगस्ट १९५४ रोजी त्यांचा जन्म झाला. बी. कॉम. पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. आई-वडिलांकडून त्यांना वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन, संस्कार हे त्यांच्या राजकीय सभ्यतेतून ठळकपणे जाणवत असत. नांदेड जिल्ह्यातील लोक म्हणून वसंतराव यांच्याकडे एक सभ्य, सुसंस्कृत, निष्कलंक, चारित्र्यसंपन्न राजकारणी म्हणून आदराने पाहत. त्यांचे वडील कै. बळवंतराव चव्हाण हे नांदेड परिसरातील सन १९५५ च्या काळातील एक मुरब्बी राजकारणी होते. महाराष्ट्राचे शिल्पकार व माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा भारताचे संरक्षण मंत्री शंकरराव चव्हाण, महाराष्ट्रातील जाणते राजे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या जडणघडणीमध्ये ते घडले आणि वाढले. त्यामुळे स्वार्थापेक्षा समाजनिष्ठा व देश सेवेसाठी राजकारण हे त्यांच्या रक्तामध्ये भिनले होते. तोच वसा आणि वारसा वसंतराव चव्हाण यांनी पुढे चालवला. नायगाव परिसर आणि नांदेड जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक इ. क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय स्वरूपाचे आहे, म्हणून ते नांदेडच्या राजकीय इतिहासातील एक महत्त्वाचे रत्न होते. बुद्ध, शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणारे वसंतराव चव्हाण हे लोकभावना जपणारे व जाणणारे जनसामान्यांचे नेते होते.

माजी खासदार कै. वसंतराव चव्हाण हे सन १९७८ ते २००२ सलग चोवीस वर्षे नायगाव ग्रामपंचायतचे सरपंच होते. या काळात त्यांनी लोकोपयोगी कामांना अधिक महत्त्व दिले. या सरपंचकीच्या काळात त्यांना बिलोली परिसरातील अनेक गावातील सरपंच आदराने पाहत होते. त्यामुळे त्यांना बिलोली सरपंच संघटनेचे अध्यक्ष केले. विकासाभिमुख सरपंच, यशस्वी जिल्हा परिषद सदस्य, नायगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य, विधान परिषदेचे सदस्य, विधानसभेचे सदस्य ते देशाच्या सर्वोच्च स्थानी समजल्या जाणाऱ्या लोकसभेचे सदस्य (खासदार) म्हणून त्यांनी केलेला हा १९७८ ते २०२४ हा ४६ वर्षाचा प्रदीर्घ राजकीय प्रवास अत्यंत प्रेरणादायी स्वरूपाचा होता. सन २०२१ ते २०२३ नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद आहे या काळात बँकेला वैभव प्राप्त करून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

नेता वह नही जो
हवा के साथ बदले!
नेता वह है जो हवा
का रुख बदले !!

देशाच्या आणि महाराष्ट्राच्या वर्तमान राजकीय परिस्थितीचे चित्र लक्षात घेता इथल्या जनतेच्या मनात लोकप्रतिनिधी संदर्भात अनेक संशय कल्लोळ आहेत; परंतु वसंतराव चव्हाण यांच्या बाबत लोकमनात एक आदर भावना आणि विश्वास होता. शेतकरी, शेतमजूर, महिला, सुशिक्षित बेरोजगार, दलित वंचित समूहाच्या समस्या व त्यांच्या प्रश्नांची त्यांना बारकाईने जाण होती.सरपंच ते लोकसभा सदस्य हा त्यांचा जीवन प्रवास विविध अनुभवांनी समृद्ध झाला आहे, त्यामुळे लोकांचे प्रश्न काय आहेत? त्यांच्या मूलभूत समस्या कोणत्या आहेत? राजकारणी म्हणून आपण लोकांना काय द्यायला हवे? हे त्यांना कुणी सांगण्याची गरज नव्हती.नांदेड जिल्ह्यासह आपल्या नायगाव, बिलोली, उमरी तालुक्याचा विकास व्हावा यासाठी ते दिवस-रात्र एक करून अथक प्रयत्न करत होते.

माजी खासदार कै. वसंतराव चव्हाण यांनी नायगाव या दुर्गम भागातील तालुक्यामध्ये ज्ञानगंगा आणून एक शैक्षणिक पर्व सुरू केले. आपल्या तालुक्यातील प्रत्येक युवक सुशिक्षित झाला पाहिजे. त्याला उच्च दर्जाचे शिक्षण मिळायला हवे तरच त्याचे जीवनमान उंचावेल हे त्यांना ठाऊक होते. या पवित्र आणि उदात्त हेतूने बदलत्या काळाची पावले ओळखून नायगाव परिसरात त्यांनी एक शैक्षणिक पर्व सुरु केले. त्यांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू करून त्या परिसरातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, श्रमकरी, वंचित, दलित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. जनता हायस्कूल व जनता कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना करून या भागातील विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण घेण्याची सोय करून दिली. आधुनिक क्षेत्रातील शैक्षणिक बदल लक्षात घेता नायगाव तालुका नेहमी पुढे राहावा याकरिता त्यांनी डी.एड., बी.एड., डी फार्मसी, कृषी तंत्र महाविद्यालय, तंत्रनिकेतन महाविद्यालय, फुड टेक्नॉलॉजी इत्यादी शैक्षणिक युनिटची स्थापना करून त्या परिसरातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख, उच्चतम व दर्जेदार शिक्षण मिळवून दिले यावरून त्यांची ध्येयवादी व कल्पक शैक्षणिक दृष्टी किती व्यापक होती हे दिसून येते.

दांडगा जनसंपर्क असणारे आणि राजकीय मुत्सद्दीपणात चाणाक्ष असणारे वसंतराव चव्हाण हे कला, साहित्य, संगीत, क्रीडा या क्षेत्राचे आवडते रसिक होते. त्यांना वाचनाची खूप आवड होती.अध्यात्मिक व वैचारिक ग्रंथ त्यांना खूप आवडत. कवी, लेखक, साहित्यिक, कलावंत यांच्याबद्दल त्यांच्या मनात आस्था होती. राजकीय जीवनात प्रचंड व्याप असून देखील मराठी आणि हिंदी कथा, कविता, कादंबरी वाचनाचे वेड त्यांनी मनापासून जपले. त्यांच्या साहित्यिकांशी होणाऱ्या गप्पागोष्टीमधून ते वेळोवेळी जाणवत. आपल्या संस्थेतील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनावर कथा, कविता, कादंबरी वाचनातून मानवी संस्कार मूल्य रुजावेत या हेतूने त्यांनी सन १९९२ मध्ये साहित्यिक बाबा भांड आणि भारतभूषण गायकवाड, वेणूकार नारायण शिंदे, कवी दा. मा. बेंडे यांच्या सहकार्यातून विभागीय बालकुमार साहित्य संमेलनाचे नायगाव येथील शैक्षणिक संकुलात अत्यंत नेटके व यशस्वी आयोजन केले. पुढे काही वर्षांनी नायगाव येथे त्यांनी मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने तिसावे मराठवाडा साहित्य संमेलन आयोजित केले यावरून त्यांची कला व साहित्याची रुची लक्ष्यात येते. आपल्या परिसरातील लोकांना व विद्यार्थ्यांना मराठी साहित्यिकांची ओळख व्हावी त्यांच्या मनात वाचन संस्कृतीचे मूल्यभान निर्माण व्हावे यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले त्यामुळे वाचन, लेखन, चिंतन, मनन या संदर्भात असणारी त्यांची कलात्मक दृष्टी किती ग्रेट होती हे दिसते.

मराठवाड्यातील जुने जाणते, सकारात्मक विचाराचे एक निर्भीड राजकारणी म्हणून वसंतराव चव्हाण यांच्याकडे पाहिले जात होते. राजकीय चातुर्य आणि माणसे जोडण्याची अपूर्व कला असलेले, विकासाची दृष्टी लाभलेले एक व्यासंगी व्यक्तिमत्व म्हणून ते सर्वदूर परिचित होते. पक्ष फोडाफोडी, पळवापळवी, स्वार्थीवृत्ती या कोणत्याही आमिषाला ते कधीही बळी पडले नाहीत. त्यांच्या भाषणातून नेहमी विकासाभिमुख दृष्टी जाणवत असे त्यांची भाषाशैली कधीही कोणाचा अवमान, अपमान करणारी नव्हती यावरून ते किती सुसंस्कृत राजकारणी आहेत हे लक्षात येई. आपण स्वतः एक व्यक्ती आहोत, पक्ष म्हणजे एक विचारधारा असते. एखादा व्यक्ती दुसऱ्या पक्षात गेली म्हणजे तो पक्ष कधीही संपत नसतो तर त्या पक्षाच्या पडझडतीच्या काळात त्या पक्षासोबत राहणे हीच खरी पक्षनिष्ठा असते असे त्यांचे मत होते, म्हणून त्यांनी स्वतःच्या हितापेक्षा पक्षनिष्ठा महत्त्वाची मानली व लोकांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला नाही. त्यांच्या अशा अचानक जाण्याने एक मायाळू नेता, दुःखी माणसांचा आधार, शेतकऱ्यांचा कैवारी हरवला असे वाटते. अशा या जनप्रिय लोकाभिमुख नेतृत्वास कोटी कोटी नमन आणि भावपूर्ण आदरांजली!

**-प्रा. डॉ. व्यंकटी पावडे**
मराठी विभागप्रमुख,
के. आर. एम. महिला महाविद्यालय,
नांदेड.
मो. ९६५७२७८२१७

# जनतेच्या सर्वांगीण विकास गंगेचे आधुनिक भगिरथ : कै. खा. वसंतराव चव्हाण





कै. अमृतराव पाटील चव्हाण यांच्या आध्यात्मीक, सामाजिक कार्याची वारसा चालवून कै. बळवंतराव चव्हाण, दाजीराव पाटील, शंकरराव पाटील व व्यंकटराव पाटील यांनी सामाजिक सेवेतून संबंध जिल्ह्यात नावलौकिक मिळवला.

कै. खा. वसंतराव चव्हाण हे नायगाव ग्राम पंचायतचे २२ वर्षे बिनविरोध सरपंच राहिले. तरुण तडफदार, मनमिळाऊ ग्रामीण नेतृत्त्व म्हणून ते पुढे आले. सरपंच संघटनेचे जाळे त्यांनी जिल्हाभर विणले. व सबंध जिल्हाभरात मित्रांचे नेटवर्क जोडले. इ. स. १९९० ते १९९५ पर्यंत जिल्हा परिषद सदस्य म्हणून प्रभावी काम केले. काँग्रेस पक्षाचे तरुण नेते त्यांच्या संपर्कात होते. काँग्रेस पक्षाचे सदस्य म्हणून अतिशय तळमळीने व प्रसंगी संघर्ष करुन जनतेचे प्रश्न सोडवण्याचा त्यांचा सतत प्रयत्न राहिला. जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी जे मूलभूत प्रश्न सोडविण्याच्या हेतूने त्याचा अभ्यास केला. सिंचन, दळणवळण व शैक्षणिक सुविधा या प्रश्नावर लक्ष केंद्रीत करुन या प्रश्नाची सोडवणूक करत सातत्याने ते राजकारणात क्रियाशील राहिले. बिलोली तालुक्याचे पंचायत समितीचे सभापती पद त्यांच्या सुविद्य पत्नी सुंदरताई चव्हाण यांना मिळाल्या नंतर समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत त्यांना पोहचता आले. ग्रामीण विकासाच्या अनेक योजना राबवता आल्या. १९९७ ची विधानसभा पोटनिवडणुकीत कै. बळवंतराव चव्हाण यांना विजयी करण्यासाठी संपूर्ण व्युहरचना वसंतराव चव्हाण यांनी योजली व यशस्वी केली.

नायगाव हे एक बाजाराचे गाव होते. आज ते तालुका निर्मित व सर्व दृष्टीने विकसित स्वरुपात येण्यासाठी संघर्ष करुन मराठवाड्याच्या पटलावर महत्वाचे शहर म्हणून ठसा उमटवण्याचे कार्य केले. या कामात परिसरातील जनता, कार्यकर्ते व स्थानिक व्यापारी यांनी त्यांना भक्कम साथ दिली. नायगाव तालुका निर्मितीमध्ये अनेक मंडळीने खोडा घालण्याचे काम केले, पण कै. खा. वसंतराव चव्हाण यांनी संघर्षातून यश मिळवले. नायगावच्या विकासाचा पाया कै. बळवंतराव चव्हाण यांनी रचला व त्यावर सुवर्ण कळस बसवण्याचे कार्य कै. खा. वसंतराव चव्हाण यांनी पूर्ण केले.

१९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेला संपूर्ण जिल्ह्यातून हजारो कार्यकर्ते मुंबईला नेऊन व नंतर अनेक नगरपालिका, ग्रामपंचायती राष्ट्रवादी पक्षाचा पताका प्राचार्य लव्हेकर सर, प्राचार्य क्षीरसागर, प्राचार्य प्रा. माने, प्रो. मेड इत्यादींनी सहकार्य केले. तर सांस्कृतिक कामात नारायण शिंदे यांनी पुढाकार घेऊन बाळकुमार साहित्य संमेलन व मराठवाडा साहित्य संमेलन त्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी केले.

महाराष्ट्रस्तरीय अधिवेशनास प्रा. जांभरुकर यांच्या विनंतीवरुन साने गुरूजींच्या गावी अमळनेर येथे उपस्थित राहिले. नायगावचे चव्हाण घराणे हे एकत्रीत कुटुंब पद्धतीमुळे जिल्हाभरात आदर्श मानले जाते. विधानसभा २००९ ते २०१६ लोकसभा २०२४ ह्या निवडणुकीमध्ये समाजातील एक सर्वस्तरातील लोकांचे प्रेम, आशीर्वाद त्यांच्या मागे होताच तसेच कौटुंबिक ऐक्य या बळावर निवडणुका जिंकल्या. नायगावचे स्थान तालुक्यापासून राष्ट्रीयस्तरावर पोहचवले. जिल्हा बँकेचे संचालक व चेअरमन म्हणून तोट्यात असलेली जिल्हा मध्यवर्ती बँक नफ्यात आणली. नायगाव बाजार समितीचे चेअरमन म्हणून कुठल्याही बाजार समितीत नसलेले बाजार समितीच्या मालकीचा पेट्रोलपंप, गोदाम उभारले.

राजकीय कारकिर्द यशस्वी होण्यासाठी आई कलावतीबाई बळवंतराव चव्हाण, पत्नी सुंदरताई वसंतराव चव्हाण, भाऊ केशवराव चव्हाण, हनमंतराव चव्हाण, सुधाकरराव चव्हाण, श्रीनिवासराव चव्हाण, विजय चव्हाण यांचा या यशात मोठा वाटा आहे.

कै. खा. वसंतराव चव्हाण यांनी नायगाव, जिल्हा व मराठवाड्यासाठी शिक्षण संस्थेत राबवलेले नायगावातील जि. प. शाळा माध्यमिकस्तरावर दर्जा वाढ व स्वतंत्र इमारत बांधून दिली. पशुवैद्यकीय अद्ययावत दवाखाना उभारणी, अद्ययावत पोस्ट ऑफीस इमारत उभारणी व कार्यन्वित केली.नायगाव शिक्षण संस्थेअंतर्गत कृषी महाविद्यालय, अन्न तंत्रमहाविद्यालय, लिटल स्टेप इंग्रजी शाळा, डी. फॉर्मसी कॉलेज, बी. फार्मसी कॉलेज, पॉलिटेक्निक कॉलेज, आय.टी. आय. कॉलेज संस्थेच्या नरसी, घुंगराळा, लोहगाव येथील कनिष्ठ महाविद्यालय शाखा, संस्थेसाठी पाच-पाच एकरचे दोन कॅम्पस अत्याधुनिक चार मजली इमारतीसह नायगाव परिसरात संस्थेला १७५ एकर जमीन खरेदी करून दिली.

एम.जी.एम. कॉलेजच्या सहकार्याने दोन वेळा मोफत रुग्ण तपासणी शिबीर घेऊन मोफत उपचार व औषधी उपलब्ध करुन दिली. १९९३ मधील किल्लारीमधील भूकंपग्रस्तांना ग्रामपंचायत शिक्षण संस्था व गावातील प्रतिष्ठितांकडून भरीव निधी दिला. दरवर्षी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन व बक्षीस वाटप. शिक्षण संस्थेमार्फत दरवर्षी कै. अमृतराव चव्हाण वक्तृत्व स्पर्धा आयोजन, १९०४ मध्ये जिल्हास्तरीय उत्कृष्ट विज्ञान प्रदर्शन व बक्षीस वाटपाची मोफत सुविधा, जिल्हास्तरीय शेतकरी मेळावे व मोफत बी -बियाणे वाटप, मराठवाडा स्तरावरील बालकुमार साहित्य सम्मेलनाचे आयोजन, मराठवाडास्तरीय स्वातंत्र्य सेनानी यांचा सन्मान सोहळा आयोजन, तत्कालीन कुलगुरू जनार्दन वाघमारे यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत ग्रामीण पुनर्रचना, श्रमदान शिबीरे कोकलेगाव, कोलंबी, देगाव, होटाळा इ. जिल्हास्तरीय दोन वेळा स्काऊट गाईड मेळाव्याचे आयोजन. साक्षरता अभियानात एज्युकेशन सोसायटी अधिक क्रियाशील, दरवर्षी मराठवाडा मुक्ती संग्राम दिना-निमीत्त १७ सप्टेंबर रोजी स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारस यांचा सत्कार या सर्व उपक्रमात संस्थेचे सर्व कर्मचारी, प्राचार्य, व संचालक मंडळाचे भरीव सहकार्य राहिले आहे.

**-प्रा. गोविंद शंकरराव मेथे**
माजी प्राचार्य,
जनता कनिष्ठ महाविद्यालय,
नायगांव ता. नायगाव जि. नांदेड

# सामान्यातल्या सामान्य व्यक्तीला असामान्य वागणूक देणारे नेतृत्त्व- कै. वसंतराव चव्हाण

असे म्हणतात की,

मिलती है मंजिले उन्हे जो
भटकते है सही, गुमराह है वो लोग जो
घर से निकलते ही नही!

या ओळींना सार्थ ठरवत आमचे मार्गदर्शक कै. खा. वसंतराव चव्हाण यांनी संपूर्ण आयुष्य जगले.

मी त्यांना माझ्या लहानपणापासूनच वसंतदादा असे आदरयुक्त संबोधन करीत आलो. त्यांची आणि माझी ओळख कधी झाली हे मी नक्की जरी सांगू शकत नसलो तरी मी त्यांना लहानपणापासून पाहत आलेलो आहे. माझे बाबा माधवराव पाटील शेळगावकर आणि माजी आमदार कै. बळवंतराव चव्हाण यांच्यातील अत्यंत घनिष्ठ आणि आदरयुक्त नाते मी वेळोवेळी अनुभवलेले आहे. स्वर्गीय अण्णांचा आणि माझा जरी फारसा संबंध आलेला नसला तरी आमच्या बाबांच्या माध्यमातून त्यांच्या बाबतीमध्ये अनेकदा भरभरून ऐकायला मिळालं. स्वर्गीय अण्णा सामान्यतल्या सामान्य व्यक्तीला किती सन्मानाची वागणूक देत असत याचं भरभरून कौतुक आमच्या बाबांनी अनेक वेळेस अनेक उदाहरनासकट आम्हांला सांगितलं. त्यामुळे त्यांच्याप्रती माझ्या मनामध्ये एक आत्यंतिक आदराची भावना आजपर्यंत कायम आहे आणि हाच वारसा सन्माननीय वसंतदादांनी अत्यंत दमदारपणाने त्यांच्या कारकीर्दीमध्ये चालवल्याचे मला प्रत्यक्षात पाहायला मिळाले.



वसंतदादांच्या व्यक्तिमत्त्वाचा आवाका सामान्य माणसाचा सहजपणे लक्षात येणं एवढं सोपं नव्हतं. आपल्याला ती कथा माहीत आहे. एकदा पाच आंधळ्यांना हत्तीच्या समोर उभं केल्या गेलं आणि त्यांना सांगितलं की, हत्तीचे वर्णन करा. त्यातील एकाने हत्तीच्या शेपटीला हात लावला आणि तो म्हणाला हत्ती हा दोरीसारखा आहे. दुसऱ्याने पायाला हात लावला तो म्हणाला, हत्ती हा खांबासारखा आहे. तिसऱ्याने हत्तीच्या पाठीला हात लावला आणि तो म्हणाला, हत्ती हा भिंतीसारखा आहे. चौथ्याने हत्तीच्या कानाला हात लावला आणि तो म्हणाला हत्ती हा सुपासारखा आहे. पाचव्याने हत्तीच्या सोंडेला हात लावला आणि तो म्हणाला, हत्ती हा सापासारखा आहे. थोडक्यात तात्पर्य असे, ज्याला जेवढे वसंतदादा समजले तेवढ्यापुरतं त्याने वर्णन केलं, परंतु समग्र हत्ती मला वाटतं फार कमी जणांना दिसला किंवा समजला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल बोलायचं म्हटलं तर एक पुत्र म्हणून, एक भाऊ म्हणून, एक पुतण्या म्हणून, एक पती म्हणून, एक जावई म्हणून, एक पिता म्हणून, एक काका म्हणून, एक व्याही म्हणून, एक आजोबा म्हणून, एक सरपंच म्हणून, एक पं. स. सभापती म्हणून, एक जिल्हा परिषद सदस्य म्हणून, एका महत्वपूर्ण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून, विधान परिषद सदस्य म्हणून, विधानसभा सदस्य म्हणून, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून, लोकसभा सदस्य म्हणून आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे जनतेचा नायक म्हणून त्यांनी अनेक भूमिका लीलया वाठविल्या. त्यांच्यातील मला जाणवलेली एक अत्यंत कौतुकास्पद बाब म्हणजे या सर्व भूमिका वठवत असताना त्यांनी राजकारणातील सातत्य आणि स्वतःचं संतुलन कधी ढळू दिल्याचं मला पाहण्यात आलं नाही. त्यांची निर्णयक्षमता अत्यंत जबरदस्त होती.

योग्य वेळी योग्य निर्णय आणि घेतलेला निर्णय तडीस नेण्याची त्यांची मानसिकता हेच त्यांच्या यशाचे गमक राहिलेले आहे. विधान परिषदेची मुदत संपल्यानंतर अपक्ष विधानसभा लढवण्याचा त्यांचा निर्णय असो किंवा काँग्रेस पक्षामध्ये बऱ्याच मान्यवरांनी पक्ष त्याग केल्याच्या नंतर लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय असो, हे दोन्हीही निर्णय त्यांच्या आयुष्यामध्ये मैलाचे दगड ठरले आहेत हे सत्य कुणीही नाकारू शकत नाही. म्हणतात ना, हिम्मत ए मर्दा तो मदत दे खुदा या म्हणीप्रमाणे त्यांनी प्रत्येक वेळी हिंमत केली आणि त्याची किंमत ईश्वराने आणि जनतेने करून त्यांना दाद दिली.

नांदेड जिल्ह्यातील विकासाचे प्रश्न, सामान्य नागरिकांचे प्रश्न, कार्यकर्त्यांचे प्रश्न, सामान्य नागरिकांचे प्रश्न, शैक्षणिक समस्या आणि शेतीविषयक समस्या अशा अनेक समस्यांचा त्यांना दांडगा अभ्यास होता आणि या समस्यांवर मात करण्यासाठी ते हळूहळू कंबर कसत होते, परंतु प्रकृतीने त्यांना साथ दिली नाही आणि दुर्दैवाने आपण आपला नेता गमावला.

२०१९ च्या निवडणुकीनंतर प्रकृती म्हणावी तशी साथ देत नाही हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर बंडू पाटलांना २०२४ च्या निवडणुकीमध्ये विधानसभेत पाठवण्याचा त्यांचा निर्धार आणि त्यासाठी त्यांनी सुरू केलेली तयारी हे त्यांच्यातील परिपक्व राजकारणाचे दर्शन घडवते. परंतु म्हणतात ना, ईश्वर तुम्हाला ते देत नाही जे तुम्हाला पाहिजे असते. ईश्वर तुम्हाला ते देते जे तुमच्यासाठी चांगलं असतं. वसंतदादांना बंडू पाटलांना महाराष्ट्राच्या सर्वोच्च सभागृहात पाठवायचं होतं, परंतु नियतीने त्यांना देशाच्या सर्वोच्च सभागृहात पाठवलं. निश्चितच बंडू पाटील खासदार झाल्याचा प्रचंड आनंद आहेच, परंतु तुम्हाला गमावल्याचं आम्हाला प्रचंड दुःखही आहेच.

याप्रसंगी समारोप व्यक्त करताना मी एवढेच सांगू इच्छितो की, तुम्हाला अपेक्षित असलेली सामान्य जनतेची सेवा करण्यामध्ये आम्ही तुमचे कार्यकर्ते या नात्याने कधीही कमी पडणार नाही अशा भावना व्यक्त करतो.

ईश्वरचरणी एवढीच प्रार्थना करतो त्यांनी आमच्या वसंतदादांना त्यांच्या दरबारात मानाचे स्थान द्यावे, त्यांच्या आत्म्यास चिरशांती प्रदान करावी.

**-प्राचार्य संजय पाटील शेळगावकर**
सचिव
ज्ञान संवर्धन शिक्षण प्रसारक
मंडळ, धुप्पा, ता. नायगाव, जि. नांदेड
मो. ९४२२१७२१७३

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# जिरे पावडर निर्मिती

**जिरे हा मानवाच्या दैनंदिन वापरात असलेल्या महत्त्वाच्या मसाल्यांपैकी एक आहे. जिरे वाळवून त्याची पावडर करून विविध पदार्थांमध्ये वापरली जाते. जिरे विशिष्ट सुगंधासाठी मसाला म्हणून वापरले जाते. जिऱ्याची योग्यवेळी कापणी ही पावडर उत्पादनाच्या गुणवत्तेच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. मसाल्यांच्या निर्यातीसाठी बियाणे गुणवत्ता हा सर्वांत महत्त्वाचा निकष आहे.**



- वाळवणी : जिरे स्वच्छ केले जाते. दुसऱ्या टप्प्यात वाळवताना सावलीत ठेवावे. जेणेकरून बिया जास्त गरम होणार नाहीत. सूर्यप्रकाशात वाळवल्याने बियाण्यांमधून ओलावा निघून जातो. प्रक्रियेसाठी १० टक्के ओलावा असेपर्यंत वाळविले जाते. जर हवामान खूप दमट असेल तर ड्रायरचा वापर करावा. अन्यथा, बियाणे चटई किंवा ट्रेमध्ये ठेवून सूर्यप्रकाशात वाळवावे.
- स्वच्छता : जिऱ्यामधून गवताच्या बियाण्यांना वेगळे करण्यासाठी व्हायब्रो सेपरेटर वापरला जातो. कमी रंगाचे जिरे वेगळे करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध आहे. वजनाच्या आधारावर घटक वेगळे करण्यासाठी ग्रॅव्हिटी सेपरेटर वापरतात.
- पावडर निर्मिती : वाळवलेले जिरे बारीक दळून पावडर तयार केली जाते. तयार पावडर पॅक केली जाते.

## यंत्रसामग्री

- डी-स्टोनर : हे यंत्र जिऱ्यातील अखाद्य घटक वेगळे करण्यासाठी वापरतात.
- व्हायब्रेटिंग प्री-क्लिनर : जिऱ्यातून मोठे अशुद्ध घटक काढण्यासाठी वापरतात.
- ड्रम सिव्ह : उच्च क्षमतेने जिऱ्याच्या बियाण्यांमधून मोठ्या अशुद्धी काढून टाकण्यासाठी हे यंत्र वापरतात. योग्य प्राथमिक स्वच्छता उत्पादन प्रक्रियेतील पुढील उपकरणांवर होणारे झीज आणि ताण कमी होतो.
- पावडर ग्राइंडिंग यंत्र : अन्नपदार्थ, औषधी वनस्पती, जिरा पावडर, राळ पावडर, रसायने, औषधे, आणि इतर घटक दळण्यासाठी वापरतात.
- स्वयंचलित पाउच पॅकेजिंग यंत्र : पावडर विविध प्रमाणांमध्ये पाउचमध्ये भरून पॅकिंग केले जाते.

## जिऱ्यामधील पोषणमूल्य (१०० ग्रॅम)



- ऊर्जा ३७० कॅलरी
- कार्बोहायड्रेट्स ४४.२४ ग्रॅम.
- तंतुमय घटक १०.५ ग्रॅम.
- स्निग्ध पदार्थ (फॅट) २२.२७ ग्रॅम.
- प्रथिने १७.८१ ग्रॅम.
- थायमीन (जीवनसत्त्व बी१) ०.६२८ मि.ग्रॅ.
- रायबोफ्लेविन (जीवनसत्त्व बी२) ०.३२७ मि.ग्रॅ.
- नायसिन (जीवनसत्त्व बी३) ४.५७९ मि.ग्रॅ.
- जीवनसत्त्व बी ६ ०.४३५ मि.ग्रॅ.
- जीवनसत्त्व सी ७.७ मि.ग्रॅ.
- जीवनसत्त्व ई ३.३३ मि.ग्रॅ.
- कॅल्शिअम ९३१ मि.ग्रॅ.
- लोह ६६.३६ मि.ग्रॅ.
- मॅग्नेशिअम ३६६ मि.ग्रॅ.
- फॉस्फरस ४९९ मि.ग्रॅ.
- पोटॅशिअम १७८८ मि.ग्रॅ.
- सोडियम १६८ मि.ग्रॅ.
- जस्त ४.८ मि.ग्रॅ.



# आल्यापासून पावडर, कॅण्डी, ज्यूस

**आल्यापासून कॅण्डी, मुरंबा, पावडर, पेस्ट,ज्यूस, तेल निर्मिती करता येते. मसालेदार चव आणि आल्हाददायक सुगंधामुळे आल्याचा वापर पेय, ब्रेड, सूप, लोणचे आणि अनेक शीतपेयांमध्ये चवीसाठी केला जातो. प्रक्रिया उद्योगामध्ये अर्क, ओलिओरेसिनचा वापर करतात...**

- पावडर : आले चांगले धुवून, सोलून त्याचे पातळ तुकडे करावेत. त्यानंतर रॅकवर तुकडे ठेवावेत. तापमान नियंत्रित खोलीत तुकडे पूर्णपणे निर्जलीकरण होईपर्यंत अनेक दिवस वाळवले जातात. हा टप्पा महत्त्वाचा आहे, कारण आल्याची चव आणि सुगंध टिकवून ठेवण्यास मदत होते. तुकडे कोरडे झाल्यावर यंत्राने बारीक पावडर बनवतात. ही पावडर प्लास्टिकच्या पिशवी किंवा पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये पॅक केले जाते. लेबल करून सीलबंद केली जाते.
- कॅण्डी : हिरवे आले ५ ते ६ महिन्यांचे असताना काढावे. हे व्यवस्थित धुऊन आवश्यक एकसमान आकाराचे तुकडे करावेत. नंतर ते दोन टप्प्यांत पाण्यात उकळले जाते. पहिला टप्पा ५ मिनिटे आणि दुसरा टप्पा १० मिनिटांसाठी ठेवावा. प्रत्येक टप्प्यानंतर जास्तीचे पाणी काढून टाकावे. यामुळे आल्याचा तिखटपणा कमी होतो. हे आल्याचे तुकडे उकळत्या साखरेच्या द्रावणात मिसळावेत. एक किलो आल्यावर प्रक्रियेसाठी ६०० ग्रॅम साखर आणि २५० मिलि पाण्यात ४ ग्रॅम सायट्रिक ॲसिड लागते. या मिश्रणातील पाण्याचे जास्तीत जास्त बाष्पीभवन होईपर्यंत उकळावे. त्यानंतर गरम करणे थांबवावे आणि उर्वरित द्रावण काढून टाकावे. त्यानंतर तयार कँडी बाहेर काढून ७५ अंश सेल्सिअस तापमानात सुमारे ४ तास गरम एअर ड्रायरमध्ये ठेवावी. यानंतर तीन तास कॅण्डी सामान्य तापमानात गार करत ठेवावी. कॅण्डी करून शिल्लक राहिलेला पाक पुन्हा वापरता येतो.

### पोषकद्रव्ये (प्रती १०० ग्रॅम)

- पाणी- ९.४ ग्रॅम
- प्रथिने -९.१ ग्रॅम
- ऊर्जा -३४७ किलो कॅलरी
- चरबी-६.० ग्रॅम
- एकूण कर्बोदके -७०.८ ग्रॅम
- तंतूमय घटक -५.९ ग्रॅम



- ज्यूस : आल्याचे तुकडे चांगल्या प्रकारे धुवून सोलून ग्राईंडरच्या साहाय्याने पेस्ट करावी. नंतर फिल्टर कापडातून रस गाळून घ्यावा. ज्यूस तयार करण्यासाठी साखरेचे द्रावण (१ लिटर पाणी अधिक २०० ते ३०० ग्रॅम साखर) तयार करावे. हे द्रावण आल्याच्या रसात मिसळावे. सुमारे ६० मिलि गाळलेला रस एक लिटर सिरपमध्ये मिसळावा. या मिश्रणात १० ग्रॅम सायट्रिक ॲसिड आणि ४० मिग्रॅ केएमएस मिसळावे. त्यानंतर २० मिनिटांसाठी १०० अंश सेल्सिअस तापमानात उकळावे. ज्यूसचे निर्जंतुकीकरण झाल्यावर बाटलीमध्ये पॅक करावे.
- सरबत : ५० ग्रॅम बारीक चिरलेले आले साखरेच्या पाकात (दोन कप पाण्यात एक कप साखर) उकळावे. हे मिश्रण एक तास शिजवावे. त्यानंतर हे द्रावण गाळावे. त्यामध्ये चवीनुसार व्हॅनिला किंवा लिंबू रस मिसळावा. या सरबताचे चांगले पॅकिंग करावे.



# सीताफळापासून गर, पावडर निर्मिती

**सीताफळ हे पौष्टिक फळ आहे. सीताफळाची प्रक्रिया करून विविध मूल्यवर्धित उत्पादने तयार करता येतात. या फळामध्ये कार्बोहायड्रेट्स असतात, जे शरीराला त्वरित ऊर्जा देतात. फळातील जीवनसत्त्व क हे प्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. जे दीर्घकालीन आजारापासून दूर ठेवते. या फळात कमी फॅट आणि कोलेस्टेरॉल असते, जे आरोग्यासाठी उपयुक्त आहे. यामध्ये पोटॅशिअमसारखे खनिज हृदयाचे आरोग्य सुधारण्यास आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. हे अत्यंत पौष्टिक फळ आहे, ज्यामध्ये अनेक फायदे आहेत. याचे नियमित सेवन केल्यास आरोग्य सुधारण्यात मदत होते.**



सीताफळ थंड वातावरणात साठवून ठेवल्यास गुणवत्तेचे नुकसान होते. गर अतिशय नाजूक असतो आणि जर तो उघड्यावर ठेवला तर एका तासाच्या आत रंगबदल आणि बुरशीजन्य संसर्ग होण्याची शक्यता असते. सीताफळाचा गर गोठवून साठवल्यास कोणत्याही गुणवत्तेच्या हानीशिवाय टिकतो. या गरापासून तयार पेय, जॅम, जेली, फळ मिक्स, स्प्रे-ड्राईड पावडर तयार करता येते.

सीताफळाची विशिष्ट हंगामात मोठ्या प्रमाणात उपलब्धता होते. फळाची अल्प साठवण क्षमता आणि गर, बिया वेगळे करण्यातील अडचणींमुळे हे फळ प्रक्रियेसाठी कमी प्रमाणात वापरले जाते. संशोधनानुसार अस्कॉर्बिक ॲसिड आणि केएमएस वापरून -१८ अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमानात साठवण केल्यास गराची साठवण क्षमता ९० दिवसांपर्यंत वाढवता येते.

## गर निर्मिती

फळातील गर काढण्यासाठी यंत्र उपलब्ध आहे. याची कमाल क्षमता ३६.०८ किलो प्रति तास आहे. प्रथम पिकलेले सीताफळ पाण्याने स्वच्छ धुवावे. फळाचे हाताने दोन भाग करावेत आणि बियांसह लगदा चमच्याने काढून टाकावा. बिया आणि लगदा ब्रश प्रकारच्या पल्परच्या मदतीने वेगळा करावा. स्टेनलेस स्टीलच्या भांड्यात एक किलो गर घेऊन त्यामध्ये ०.५ ग्रॅम अस्कॉर्बिक ॲसिड आणि ०.७ ग्रॅम पोटॅशिअम मेटाबायसल्फाइट मिसळले आणि ते उणे २० अंश सेल्सिअस तापमानात गोठवले तर गर एक वर्षापर्यंत साठवू शकता.

## पावडर

एक किलो गरामध्ये ०.५ ग्रॅम अस्कॉर्बिक ॲसिड आणि ०.७ ग्रॅम केएमएस आणि ०.२५ ग्रॅम माल्टोडेक्सट्रिन मिसळावे. ५ ते ८ टक्के पाण्याचे प्रमाण ठेऊन स्प्रे ड्रायरमध्ये वाळवावे. तयार पावडर व्हॅक्युम सीलबंद पॉलिथिन पिशवीत पॅक करून थंड व कोरड्या जागी ठेवावी. आइस्क्रीम, श्रीखंड मिल्कशेक तयार करण्यासाठी या पावडरीचा वापर करतात.

## जॅम

एक किलो गरात ७०० ते ७५० ग्रॅम साखर आणि ८ ते १० ग्रॅम सायट्रिक आम्ल मिसळून पूर्णपणे विरघळावे. मिश्रण गरम करावे. गरम करताना मिश्रण सतत ढवळावे. मिश्रण घट्ट होईपर्यंत शिजवावे. यावेळी मिश्रणाचा टीएसएस ६८ टक्के असावा. तयार केलेला जॅम निर्जंतूक केलेल्या रूंद तोंडाच्या काचेच्या बाटलीमध्ये भरावा. बाटल्या थंड कराव्यात, त्यावर अल्युमिनिअम फॉइलचा एक थर लावून झाकण बसवावे. बाटल्या थंड जागी ठेवाव्यात.

# टोमॅटोपासून पावडर निर्मिती

**भारतात टोमॅटो काढणीनंतर हाताळणीच्या अभावामुळे सुमारे २५ टक्के उत्पादनाचे नुकसान होते. हे लक्षात घेऊन टोमॅटोचे स्वादिष्ट उत्पादनांमध्ये रूपांतर करता येते. टोमॅटोमधील लाइकोपीन आणि जीवनसत्त्व 'अ'मुळे त्वचा आणि केस चांगले राहातात. टोमॅटोमधील घटक रोगप्रतिकारक शक्ती वाढवितात. लाइकोपीन हाडांच्या आरोग्यासाठी चांगले आहे.**



## टोमॅटो पावडर निर्मितीची प्रक्रिया

चमकदार रंग आणि वैशिष्ट्यपूर्ण चव असलेले परिपक्व टोमॅटो निवडावेत. फळांची विविधता आणि परिपक्वता त्याच्या पावडरच्या चव आणि दर्जावर प्रभाव टाकते. फळे पक्व झाल्यावर हिरवी ते पिवळी-लाल झाली की तोडली जातात. सर्व टोमॅटो खूप लवकर मऊ होतात, ज्यामुळे त्यांना जखम होण्याची आणि नंतर सडण्याची शक्यता असते. त्यामुळे पिकलेली फळे झाडावरून हलक्या हाताने तोडावीत. फळांची काढणी सकाळच्या वेळेत करावी. वर्गीकरण हे आकार, रंग आणि वजनानुसार केले जाते. खराब झालेले फळ काढून टाकावे. स्वच्छ आणि चमकदार टोमॅटोला प्राधान्य द्यावे. सुपर ए, सुपर, फॅन्सी आणि कमर्शिअल या प्रकारे वर्गवारी केली जाते. निवडलेली फळे स्वच्छ पाण्याने धुवावीत. त्यानंतर वाळवण्याची वेळ कमी करण्यासाठी आणि अंतिम उत्पादनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी टोमॅटो सुकण्यापूर्वी कापावेत. यासाठी छोटी यंत्रे उपलब्ध आहेत. यंत्रामध्ये ट्रान्समिशन सिस्टम आणि दोन स्टेनलेस स्टील वर्तुळाकार ब्लेड असतात. यंत्राने प्रति तास १२० किलो टोमॅटो कापता येतात. भाजीपाला स्लायसर यंत्राने तुकडे करता येतात. कापलेले टोमॅटो पूर्णपणे सुके होईपर्यंत उन्हात ठेवतात. टोमॅटो कापामध्ये सहा टक्क्यांपर्यंत ओलावा ठेवावा. जास्त ओलावा होईपर्यंत वाळवले जातात. टोमॅटो काप थेट सूर्यप्रकाशात ठेवू नयेत, कारण यामुळे रंग फिकट होईल. मेकॅनिकल ड्रायर वापरल्याने चांगला रंग आणि उच्च दर्जाचे उत्पादन मिळेल. टोमॅटो सुकविण्यासाठी योग्य असलेले यांत्रिक ड्रायर उपलब्ध आहेत. यामध्ये ट्रे ड्रायर, क्रॉस फ्लो एअर ड्रायर, सोलर ड्रायर्स, कॅबिनेट ड्रायर्स आणि ऑस्मोटिक ड्राइंग पद्धतींचा समावेश आहे. चव आणि रंगाच्या दृष्टीने चांगल्या उत्पादनाच्या गुणवत्तेसह पावडरीचे लहान कण मिळवणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. या प्रक्रियेसाठी हॅमर मिल, एट्रिशन मिल, पीन मिल आणि प्लेट मिल ग्राइंडर वापरले जातात. टोमॅटो पावडर फॉर्म फिल सीलर वापरून प्लॅस्टिक किंवा फॉइल बॅगमध्ये पॅक करता येते. तसेच टीन आणि काचेच्या कंटेनरमध्ये देखील पॅकिंग करता येते.

# शेळीच्या दुधाचे फायदे किती?

**शेळीचे दूध अत्यंत गुणकारी असून, विशेषतः लहान मुलांच्या बौद्धिक विकासासाठी चांगले असते. तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी उपयुक्त आहे. आजारी व्यक्ती, पचनशक्ती चांगली नसणाऱ्यांसाठी आणि वृद्ध व्यक्ती यांच्यासाठी एक संपूर्ण आहार म्हणून शेळीचे दूध ओळखले जाते.**

पशुपालन व्यवसायामध्ये मुख्यतः गाई, म्हशी, शेळी आणि मेंढी पालनाचा समावेश होतो. शेळी-मेंढीपालन व्यवसाय मुख्यतः मांस, लोकर आणि दूध उत्पादनासाठी केला जातो. शेळीपालन मुख्यत्वेकरून मांस उत्पादनासाठी केले जाते. परंतु शेळ्यापासून मिळणाऱ्या दुधाला तितके महत्त्व दिले जात नाही. यामागे कमी दूध उत्पादन, दुधाला स्वाद व वास येतो, अशी विविध कारणे दिसून येतात. मात्र असे असले तरीही शेळ्यांचे दूध हे भरपूर प्रमाणात पौष्टिक असल्याचे अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

## महत्त्व आणि वैशिष्ट्ये



- शेळीच्या दुधात रायबोफ्लोवीन (व्हिटॅमिन बी २) योग्य प्रमाणात असते. हे अँण्टी ऑक्सिडंट असून, लाल रक्त पेशी निर्मिती, शरीरपेशींची वाढ आणि जखमा भरून येण्यासाठी होतो.
- शेळीचे दूध कॅल्शिअमचा उत्तम स्त्रोत मानला जाते. कॅल्शिअममुळे हाडांचे आरोग्य चांगले राहते. आतड्याच्या कर्करोगापासून तसेच स्त्रियांमध्ये दिसून येणाऱ्या स्तनाच्या कर्करोगापासून बचाव होतो.
- शेळीच्या दुधात पोटॅशिअम योग्य प्रमाणात असते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी शेळीचे दूध गुणकारी मानले जाते.
- शेळीचे दूध पचनास अत्यंत हलके असते. कारण यामध्ये फॅट ग्लोब्युल म्हणजेच स्निग्ध पदार्थांचे घनगोल (गोळे) आकाराने छोटे असतात.
- शेळीच्या दुधात जीवनसत्त्व 'अ' मुबलक प्रमाणात असते. हे जीवनसत्त्व डोळ्यांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी फायदेशीर ठरते. तसेच रोगप्रतिकारक शक्ती चांगली राहण्यासाठी उपयोगी असते.
- काही लोकांना गाईच्या दुधाची अॅलर्जी असते. त्यांच्यासाठी शेळी दूध उत्तम पर्याय आहे. शेळीचे दूध सेवन केल्याने त्वचा चांगली राहते. शेळीच्या दुधामध्ये अँण्टी ऑक्सिडंट गुणधर्म असल्यामुळे त्वचा टवटवीत होते.



- वजन वाढीसाठी शेळीचे दूध उपयुक्त ठरते. शेळीच्या दुधामध्ये लिनोलीक आम्ल असते. त्यामुळे लहान मुलांच्या बौद्धिक विकासासाठी शेळीचे दूध उपयुक्त ठरते. बद्धकोष्ठतेचा त्रास असलेल्या लोकांसाठी शेळी दुधाचे सेवन फायदेशीर ठरते. शेळीचे दूध पचनास अत्यंत हलके असल्याने आतड्यातील मल सहजरीत्या बाहेर काढला जातो.
- पचनाचा त्रास, दमा, अल्सर, क्षय रोग असलेल्यांसाठी शेळीचे दूध अत्यंत उपयोगी आहे. शेळीच्या दुधात पोटॅशिअम, फॉस्फरस, कॅल्शिअम, क्लोराइड, सेलेनियम, झिंक यांचे प्रमाण गाईच्या दुधाच्या तुलनेत जास्त असते. त्यामुळे कोलायटिस म्हणजेच आंत्रशोथ असणाऱ्या लोकांसाठी शेळीचे दूध चांगले असते.
- शेळीच्या दुधामध्ये गाईच्या दुधाच्या तुलनेत जास्त पौष्टिक आणि स्वास्थ्यकारक तत्त्व असतात. शेळीच्या दुधाचे नियमितपणे सेवन केल्यास प्रकृती सशक्त होऊन आजारांपासून बचाव होतो. शेळीच्या दुधामध्ये सूज प्रतिरोधक गुणधर्म असतात. त्यामुळे शरीरावरील कोणत्याही भागावर आलेली सूज कमी होण्यास मदत होते.
- शेळीच्या दुधाचे नियमित सेवन केल्यास केसांचे आरोग्य उत्तम राखले जाते. केस गळती, केस अकाली पांढरे होणे अशा समस्या दूर ठेवण्यासाठी शेळी दूध सेवन मदत करते. सांधेदुखीचा त्रास असलेल्यांसाठी शेळीचे दूध गुणकारी ठरते.
- शेळीचे दूध हे रक्तातील प्लेटलेट्स काउंट वाढविण्यास मदत करते. शेळीचे दूध पचण्यास हलके असते. त्यामुळे गॅस, आम्लपित्त अशा पोटा संबंधीच्या समस्या कमी होण्यास मदत होते.


रहे ना रहे हम, महेका करेंगे...
स्मृती सोहळा
दिनांक : २६ ऑगस्ट २०२५,
मंगळवार वेळ : स. ११.०० वा.
स्थळ : श्री हनुमान मंदिर परिसर,
नायगाव (बा.), जि. नांदेड
स्व.मा.आ. बळवंतराव अमृतराव चव्हाण व
स्व. खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या
पूर्णाकृती पुतळा अनावरण
वसंतगाथा
स्मृतिग्रंथ प्रकाशन सोहळा
सोहळ्यानिमित्त येणाऱ्या
मान्यवरांचे हार्दिक स्वागत !
या हृद्य सोहळ्यास
परिसरातील नागरिकांनी
अवश्य उपस्थित राहावं...
प्रकाशक : गजानन शिवाजीराव भिलवंडे,
चंद्रशेखर माधवराव भिलवंडे, अनिल अशोकराव पवळे,
गणेश भिलवंडे, गजानन राजेश भोसले
गोविंद ज्ञानोबा हानवटे
अध्यक्ष, स्वराज युथ फाउंडेशन, नांदेड-लातूर
Yashashree Crtn. 9422185589
• नरसी शहर काँग्रेस, नरसी •


सामाजिक समतेचे प्रणेते
स्व.मा.आ.
बळवंतराव
अमृतराव चव्हाण
नांदेड जिल्ह्याचे लोकनेते,
स्व.खा.
वसंतराव
बळवंतराव चव्हाण
ज्ञानतीर्थ
वसंतस्मृती
पूर्णाकृती पुतळा अनावरण सोहळ्यानिमित्त
येणाऱ्या सर्व मान्यवरांचे हार्दिक स्वागत!
संजय पाटील शेळगावकर
जिल्हाध्यक्ष, राजीव गांधी
पंचायत संघटन, नांदेड.


सामाजिक समतेचे प्रणेते
स्वर्गीय माजी आमदार
बळवंतराव
अमृतराव चव्हाण
नांदेड जिल्ह्याचे लोकनेते
स्वर्गीय खासदार
वसंतराव
बळवंतराव चव्हाण
पूर्णाकृती पुतळा अनावरण
॥ वसंतगाथा ॥
स्मृतिग्रंथ प्रकाशन सोहळा
मंगळवार, दि. 26 ऑगस्ट 2025
वेळ : सकाळी 11 वा.
स्थळ : श्री हनुमान मंदिर परिसर,
नायगाव (बा.), जि. नांदेड
पूर्णाकृती पुतळा अनावरण व
स्मृतिग्रंथ प्रकाशन सोहळ्यास हार्दिक शुभेच्छा !
- शुभेच्छुक -
शिवराम ईरन्ना येरसनवार
(मा.सरपंच ग्रामपंचायत लालवंडी)
नागेश शिवराम येरसनवार
(ग्रामपंचायत अधिकारी)
Kalakruti 9766434972


सामाजिक समतेचे प्रणेते
स्वर्गीय माजी आमदार
बळवंतराव
अमृतराव चव्हाण
नांदेड जिल्ह्याचे लोकनेते
स्वर्गीय खासदार
वसंतराव
बळवंतराव चव्हाण
पूर्णाकृती पुतळा अनावरण
॥ वसंतगाथा ॥
स्मृतिग्रंथ प्रकाशन सोहळा
मंगळवार, दि. 26 ऑगस्ट 2025 वेळ : सकाळी 11 वा.
स्थळ : श्री हनुमान मंदिर परिसर, नायगाव (बा.), जि. नांदेड
पूर्णाकृती पुतळा अनावरण व
स्मृतिग्रंथ प्रकाशन सोहळ्यासहार्दिक शुभेच्छा !
- शुभेच्छुक
प्राचार्य डॉ.के. हरीबाबू
अध्यक्ष, ब्लू बेल्स इंग्रजी मीडियम स्कूल, नायगाव
Kalakruti 9766434972

# भरधाव ट्रॅव्हल्सची दुचाकीला धडक; दुर्दैवी अपघातात येळी ग्रामपंचायतच्या महिला सरपंच ठार; एकजण किरकोळ जखमी



**नांदेड–**देगलूरहून प्रवाशी घेऊन नांदेडकडे जाणाऱ्या एका खासगी भरधाव ट्रॅव्हल्सची दुचाकीला पाठीमागून जबर धडक बसली. या दुर्दैवी अपघातात दुचाकीवरील महिला सरपंच जागीच ठार झाल्या तर त्यांचा मुलगा जखमी झाला आहे.

लोहा तालुक्यातील येळी येथील ग्रामपंचायतच्या विद्यमान महिला सरपंच कौतिकाबाई गणपतराव सोमवारे वय ५७ वर्षे ह्या या अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला तर त्यांचा मुलगा किरकोळ जखमी झाला आहे. ही घटना नांदेड-हैदराबाद मार्गावर येळी-हातणी ता. लोहा फाट्यावर सोमवारे, दि. २५ ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास घडली. दरम्यान अपघातानंतर चालक ट्रॅव्हल्स जागीच सोडून पसार झाला. येळी ता. लोहा येथे ग्रामपंचायतच्या विद्यमान महिला सरपंच सौ. कौतिकाबाई गणपतराव सोमवारे वय ५७ वर्षे व त्यांचा मुलगा नागोराव सोमवारे वय ४० वर्षे हे दोघे दुचाकी क्रमांक एम एच २६बी. एल.२१४४ वरून नांदेडकडे येत होते. यावेळी त्यांची दुचाकी येळी /हातणी ता. लोहा फाट्यावरून सरळ नांदेड-हैदराबाद महामार्गाने नांदेडकडे जात असताना मारतळा शिवारात पाठीमागून देगलूरहुन प्रवाशी घेऊन नांदेडकडे जाणारी भरधाव ट्रॅव्हल्स क्रमांक एम.एच.२६ एन ३५०५ यावरील चालकाने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व हयगयीने चालवत समोरील महिला सरपंच यांच्या दुचाकीस पाठीमागून जबर धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील महिला सरपंच सौ. कौतिकाबाई गणपतराव सोमवारे यांच्या डोक्यास जबर दुखापत झाली व घटनास्थळी त्या रक्ताच्या थारोळ्यात विव्हळत पडल्या. यावेळी येळी येथील माजी सरपंच शिवराज ढगे यांनी आपल्या कारमधून त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र दुर्दैवाने सरपंच यांचा उपचारापूर्वीच दुर्दैवी मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तर मयत सरपंचांचा मुलगा नागोराव गणपतराव सोमवारे वय ४० वर्षे हा जखमी झाला असून, त्याच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महिला सरपंचांच्या अपघाती निधनाने गाव परिसरातूत हळहळ व्यक्त होत आहे.

येळी येथील स्मशानभूमी दिवंगत महिला सरपंच सौ. कौतिकाबाई गणपतराव सोमवारे यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. या प्रकरणी उस्माननगर पोलीस स्टेशन येथे चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दिवंगत सरपंच यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, एक मुलगी असा परिवार असून, त्या येथील शेतकरी गणपतराव सोमवारे यांच्या पत्नी तर सामाजिक कार्यकर्ते भगवान सोमवारे यांच्या आई होत.

# उमरी तालुक्यात ऑनर किलिंगचा प्रकार; मुलीसह तिच्या प्रियकराचा खून करून प्रेत विहिरीत फेकले, वडिलांना अटक



**नांदेड (प्रतिनिधी)–** लग्नापूर्वी असलेले प्रेमसंबंध पुढेही सुरू ठेवण्यासाठी तरुणाने लग्न झालेल्या विवाहितेचा पाठलाग सुरूच ठेवला. मुलीचा संसार मोडणाऱ्या तिच्या प्रियकरासह मुलीचा खून करून दोघांचाही मृतदेह विहिरीत टाकला. ही घटना उमरी तालुक्यातील गोळेगाव शिवारात सोमवार, दि. २५ ऑगस्ट रोजी घडली. पोलिसांनी मुलीच्या वडिलास ताब्यात घेतले असून, घटनास्थळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उमरीचे ठाणेदार अंकुश माने व अन्य अधिकारी दाखल झाले आहेत.

उमरी तालुक्यातील बोरजुनी येथील संजीवनी कमळे हिचे लग्न गोळेगाव येथील एका मुलासोबत रितीरिवाजानुसार काही महिन्यांपूर्वी झाले होते. परंतु सदर मुलीचे प्रेमसंबंध हे गावातील करण भंडारे सोबत होते. लग्नानंतर करण भंडारे हा ती सासरी गेल्यानंतरही तिचा पाठलाग करत असे. त्याला अनेक वेळा तिच्या वडिलांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याच्या वागण्यात बदल झाला नाही. अखेर सोमवारी सकाळी तो पुन्हा संजीवनी कमळे हिच्या घरी गेला. यावेळी तिच्या घरच्या मंडळींनी त्याला धरून ठेवले आणि वडिलांना बोलावून घेतले. संजीवनीचे वडील मध्यस्थी करत त्याची सुटका करून दोघांनाही बोरजुणीला घेऊन निघाले. रस्त्यात गोळेगाव ते बोरजुनी दरम्यान असलेल्या एका विहिरीत या दोघांचाही तिच्या वडिलांनी आणि इतरांनी खून करून त्यांचा मृतदेह विहिरीत टाकला. या घटनेची माहिती समजताच उमरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने हे घटनास्थळी दाखल झाले.

पोलीस व इतर नागरिकांच्या मदतीने विहिरीतून मयत संजीवनी कमळे हिचा मृतदेह बाहेर काढला असून, करण भंडारेच्या मृतदेहाचा शोध सुरु होता. पोलिसांनी संजीवनी कमळे हिच्या वडिलांना ताब्यात घेतले असून त्याने हे कृत्य केल्याची कबुली दिली असल्याचे माने यांनी सांगितले.

# गवंडी व बेलदार शिष्टमंडळाच्या मागण्याबाबत पडताळणी करुन अहवाल सादर करा; महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांनी दिल्या सूचना



नांदेड दि. २५ ऑगस्ट :- नांदेड जिल्ह्यात गवंडी व बेलदार या जातीच्या समकक्षतेबाबत त्या समाजाच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांची भेट घेवून त्यांच्या मागण्या मांडल्या. सदर मागण्याबाबत पडताळणी करुन अहवाल सादर करावा, अशा सूचना महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. मच्छिंद्रनाथ तांबे, प्रा. डॉ. गोविंद काळे व डॉ. मारोती शिकारे यांनी दिल्या.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. मच्छिंद्रनाथ तांबे, प्रा. डॉ. गोविंद काळे व डॉ. मारोती शिकारे यांनी नांदेड जिल्ह्यातील गवंडी, बेलदार या जाती संदर्भात बैठक सुनावणी व कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, भोकर उपविभागीय अधिकारी प्रवीण मेगशेट्टी, हदगाव उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, कंधार उपविभागीय अधिकारी रामेश्वर गोरे, बिलोली उपविभागीय अधिकारी के.के. डोंम्बे, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त डॉ. छाया कुलाल, अध्यक्ष शरद कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार, संबंधित विभागाचे अधिकारी, बेलदार समाजाचे शिष्टमंडळाचे अध्यक्ष व सदस्यांची उपस्थिती होती.

गवंडी व बेलदार हे दोन्ही समाज समकक्ष आहेत का ? या सर्व बाबींची पडताळणी करुन उपविभागीय अधिकारी यांनी तसा अहवाल मागासवर्ग आयोगास सादर करावा, असे निर्देश आयोगाचे सदस्यांनी दिले. यावेळी मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांनी ओबीसी, एसबीसी, व्हीजेए, एनटीबी, एनटीसी, एनटीडी, एसीबीसी, ईडब्लुएस, मराठा कुणबी जात प्रमाणपत्र वितरणाबाबत आढावा घेतला. सध्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रीया सुरू असून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना जात प्रमाणपत्र पडताळणीमुळे त्यांना अडचण निर्माण होऊ नये, याची काळजी जात पडताळणी समितीने घ्यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# जिल्हास्तर ज्युनिअर ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणीचे उद्या नांदेड येथे आयोजन

**नांदेड–** महाराष्ट्र थलेटिक्स संघटनेच्या वतीने २ ते ५ सप्टेंबर २०२५ श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी १४ वर्षे आतील, १६वर्षे आतील व १८ वर्षा आतील, २० वर्ष आतील, २३ वर्ष (१२ ते १३ सप्टेंबर २०२५ मुंबई) आतील गटातील मुले व मुलींच्या राज्यस्तरीय ज्युनियर स्पर्धेसाठी नांदेड ज़िल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीने जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा व जिल्हा संघाची निवड चाचणी स्पर्धा पोलीस परेड मैदान (क्रीडा मैदान) वजीराबाद नांदेड येथे मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

यामध्ये १४ वर्षा आतील मुले व मुलींची स्पर्धा - ६० मी, ६००मी, लांब उडी, गोळा फेक व १६ वर्षा आतील मुले व मुलींची स्पर्धा ६० मी, ६०० मी. लांब उडी, ४ kg गोळा फेक, भाला फेक ६०० ग्राम, हर्डल्स ८० मीटर, १८ वर्षाआतील मुले व मुलींची स्पर्धा - १०० मी., २०० मी., ४०० मी. १००० मी धावणे, उंच उडी, लांब उडी, गोळा फेक ५ किलो, थाळी फेक १.५ किलो, भाला फेक ७०० ग्राम, ५ किमी चालणे, २० वर्ष/२३ वर्ष आतील मुले मुली १०० मी,२०० मी,४०० मी, ८०० मी,१५०० मी, ५००० मी,१०००० मी, गोळा फेक, भालाफेक,४४०० मी,४१०० मी रिले, हातोडा फेक, उंच उडी, ११०/४०० मी हर्डल्स या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेमधून विजयी खेळाडू मुले व मुलींची निवड नांदेड जिल्हा संघात केली जाणार आहे. किमान पात्रता कामगिरी करणाऱ्या खेळाडूस निवडण्यात येईल. खेळाडूंनी सोबत आधार कार्ड, जन्म दाखला (नगरपालिका/ग्रामपंचायत), पासपोर्ट साईज फोटो १, जिल्हा नोंदणी फी, इव्हेंट फी, दहावीची सनद, वय व रहिवाशी प्रमाणपत्र, सत्यप्रत सोबत आणावे. बाहेर जिल्ह्यातील खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेऊ नये. तसेच बारा वर्षे आतील खेळाडूंसाठी ही स्पर्धा नाही याची नोंद घ्यावी. याच ठिकाणी १४ व १६ वर्षे आतील वयोगटातील मुला-मुलींसाठी अंतर जिल्हा राष्ट्रीय स्पर्धा (NIDJM[2] 2025/26) संपन्न होणाऱ्या स्पर्धेसाठी देखील निवड होणार आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

संबंधितांनी स्पर्धा ठिकाणी सकाळी ८ वाजता नोंदणी करावी, असे कळविण्यात आले आहे.

१४ वर्षे आतील मुले-मुली - १५ ऑक्टोबर २०११ ते १४ ऑक्टोबर २०१३ दरम्यान जन्मलेले, १६ वर्ष आतील मुले मुली- १५ ऑक्टोबर २००९ ते १४ ऑक्टोबर २०११ दरम्यान जन्मलेले १८ वर्षआतील मुले मुली -१५ ऑक्टोबर २००७ ते १४ ऑक्टोबर २००९ दरम्यान जन्मलेले २० वर्ष आतील मुले मुली- १५ ऑक्टोबर २००५ ते १४ ऑक्टोबर २००७ दरम्यान जन्मलेले

२३ वर्षे आतील मुले मुली-१८ऑक्टोबर २००२ ते १७ ऑक्टोबर २००५ च्या दरम्यान जन्म दिनांक असणारे खेळाडू फक्त त्यांच्या संबंधित वयोगटातच भाग घेऊ शकतात. स्पर्धेपूर्वी ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया (FI) याची यूआयडी काढणे अनिवार्य आहे. यासाठी विष्णू पूर्णे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. त्यामध्ये सदस्य म्हणून डॉ. महेश जाधव, गोविंद पांचाळ, रुपाली कुलकर्णी, साईनाथ दंतुलवाड, नारायण सूर्यवंशी, शिवकांता देशमुख, कांचन मस्के, काजल मोरे, वैभव अंभोरे, बालाजी भवानकर, सविता पतंगे, शिवा जाधव, लक्ष्मण फुलारी यांची निवड करण्यात आली आहे.

स्पर्धा प्रमुख म्हणून वैभव दोम कोंडवार, ज्ञानेश्वर सोनसळे यांची निवड करण्यात आली आहे. या अजिंक्य पद स्पर्धा व निवड चाचणीमध्ये अधिकाधिक खेळाडुंनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजे खंडेराव देशमुख पळशीकर व सचिव प्रलोभ कुलकर्णी आणि सर्व पदाधिकारी यांनी केले आहे. अधिक माहिती साठी विष्णु पूर्णे सर ७५८८४३०१४५, वैभव दोम कोंडवार ९६८९९३९३७३, ज्ञानेश्वर सोनसळे ९९७०३५६२२८, गोविंद पांचाळ ९१४६८१९८१३ नांदेड, शब्बीर शेख ८८०५०२३४४० धर्माबाद, बालाजी गाडेकर भोकर ९९२१८५५०९७, शरद कपाटे ७७०९९९९८९६ नायगाव, ज्ञानेश्वर कोंडलांडे ९९७०३५६२२८ बिलोली, संतोष वाकोडे सर ७५८८४३००६५ हदगाव, कृष्णा तलवारे सर ९६५७७०७२९५ देगलूर शुद्धोधन नरवाडे ८००७७०४३५९ यांच्याशी संपर्क साधावा, असे एका पत्रकान्वये करण्यात आले आहे.

## राजपत्रित अधिकारी महासंघ राज्य संघटकपदी रामचंद्र देठे



**नांदेड –** महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाची शेगाव जि. बुलढाणा येथे २३ व २४ ऑगस्ट रोजी त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी सेवानिवृत्त जिल्हा माहिती अधिकारी रामचंद्र देठे यांची राज्य संघटकपदी सन २०२५-२०२८ कालावधीसाठी नियुक्ती झाली आहे.

# महापालिकेत भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतारदिन यांची जयंती साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिके तर्फे आज दि. २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता येथे भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त गिरिश कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी उपआयुक्त स.अजितपालसिंग संधु, उपायुक्त निलेश सुंकेवार, नगर रचनाकर पवन आलुरकर, शहर अभियंता सुमंत पाटील, आरोग्य अधिकारी डॉ. सुरेशसिंह बिसेन यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भोकर येथे सार्वजनिक गणेश मंडळाच्यावतीने श्री ज्ञानेश्वरी भाव निरूपण कथा व हरी कथा रस महोत्सवाचे आयोजन

**भोकर–** येथील सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने दि. ३० ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ दरम्यान श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या सप्त शतकोत्तरी वर्षानिमित्त श्री ज्ञानेश्वरी भाव निरूपण कथा व हरी कथा रस महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या सप्तशत्कोत्तरी वर्ष महोत्सवानिमित्त सुप्रसिद्ध कथाकार भागवताचार्य परमपूज्य बालयोगी आचार्य गजेंद्र चैतन्य महाराज यांच्या सुमधुर रसाळ वाणीतून श्री ज्ञानेश्वरी भाव निरूपण कथा दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळामध्ये होणार आहे व दररोज सकाळी ११ ते दुपारी २ या वेळात हरी कथा रस महोत्सव प्रसिद्ध कथाकार युवाचार्य संतोष महाराज आढावणे पाटील यांच्या सुमधुर रसाळ वाणीतून ऐकावयास मिळणार आहे. यामध्ये गणेश महिमा, भगवान शिव व हनुमान चरित्र, रामचरित्र, कृष्णचरित्र, नरसी मेहता, संत जनाबाई, खाटू श्याम कीर्तन, जगद्गुरु संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र कथा रूपात मांडण्यात येणार आहे.

२८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ८ ते १० या वेळात हभप मारुती महाराज इंद्रवेलीकर यांचे कीर्तन होणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक गणेश मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्लॉटच्या मालकी हक्कावरून एकावर प्राणघातक हल्ला

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्लॉटच्या मालकी हक्कावरून एकाला जबर मारहाण करून त्याच्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांविरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २४ ऑगस्ट रोजी धर्माबाद येथील पानसरे शाळेसमोर घडली.

धर्माबाद शहरातील फुलेनगर भागात राहणारा शेख पाशामिया शेख गौस (वय ५७) यांना बाळापुर तालुका धर्माबाद येथील आरोपी शेख रऊफ शेख अब्दुल, शेख हुसेन शेख वाहेदसाब या दोघांनी संगणमत करून शेख पाशामिया यास तेरे वजसे मेरा प्लॉट हाथ से जा रहा है, और मेरा बीस लाख का नुकसान हो रहा है असे म्हणून त्याच्या डोक्यात विटाने मारहाण केली. एवढेच नाही तर त्यांच्याच कार क्रमांक (एचआर ५०- डी ४२ ४०) मधून पेट्रोल काढून घेऊन शेख पाशा याच्या अंगावर टाकून पेटवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्याशी झटापट करून शेख पाशा पळून गेल्याने मोठा अनर्थ टळला. त्याच्या फिर्यादीवरून आरोपीस शेख रऊफ आणि शेख हुसेनविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री पगलवार करत आहेत.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली**
**ता. बिलोली यांचे कार्यालय**
**प्रकरण जन्म नोंद घेणे बाबत.**
**अर्ज/आवक क्र. ३२९०/२०२५**

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते की, अर्जदार नामे हणमंत मोतीराम चोपवाड, वय २२ धंदा-शेती रा. बेळकोणी बु., ता. बिलोली जि. नांदेड यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म, मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये दि. १५/०७/२०२५ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार हणमंत मोतीराम चोपवाड, वय २२ धंदा-शेती रा. बेळकोणी बु., ता. बिलोली जि. नांदेड यांचा जन्म दि.०९/०२/२०२३ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय बेळकोणी बु. ता. बिलोली, जि. नांदेड येथे उपलब्ध नाही. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, नामे हणमंत मोतीराम चोपवाड, वय २२ धंदा-शेती रा. बेळकोणी बु., ता. बिलोली जि. नांदेड यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

# रमेश जोगपेठे यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** -भाद्रा ता. लोहा येथील रहिवाशी रमेश संभाजी जोगपेठे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने २२ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या छातीमध्ये दुखू लागल्याने नायगाव येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखविण्यात आले, परंतु त्यांना नांदेडच्या शासकीय रुग्णालयात जाण्याचे सांगितल्याने ते गेले असता त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. त्यांच्या पार्थिवावर भाद्रा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, तीन मुली, दोन भाऊ आणि एक बहीण असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने भाद्रा परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# बालाजी गरुडकर यांचे निधन



**नांदेड(प्रतिनिधी)–** येथील ज्येष्ठ नागरिक इंजि. बालाजी तुळशीराम गरुडकर यांचे सोमवार, दि. २५ ऑगस्ट रोजी पहाटे चार वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६२ वर्षे होते.

बालाजी गरुडकर यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी चार वाजता नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

जिल्हा परिषदेत ते डेप्युटी इंजिनियर पदावर कार्यरत होते. त्यांनी ३३ वर्षे सलग सेवा केली. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, नातू व जावाई असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, मौजे मुगट हद्दीतील शेत सर्व्हे नंबर/गट नंबर/प्लॉट नंबर २८५ साईज ६५१ चौरस फुट सौ. कावेरी नवनाथ स्वामी वय २२ वर्षे यांचेकडून रामेश्वर भगवान मठपती रा. मुगट यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, त्यांनी बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची चतुःसिमा–**
पूर्वेस–उत्तम नंदय्या मठपती
पश्चिमेस :– केरबाजी बाबाराव
उत्तरेस:– देवीदास नंदय्या मठपती,
दक्षिणेस :– रस्ता.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील शेत जमिनीवर कोणाचा काही हक्क, उजर, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, हक्क, आक्षेप जे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व शेतीची खरेदीखत करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
रामेश्वर भगवान मठपती
मु. पो. मुगट, ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. क्र. ९६०४९५२७५८

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, मौजे निळा हद्दीतील शेत सर्व्हे नंबर, गट नंबर १२८ साईज २ आर ५ गुंठे शिवशंकर किशनअप्पा पत्रे यांचेकडून विश्वनाथ राघोजी आमदरे पाटील नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, त्यांना बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची चतुःसिमा–**
पूर्वेस–डोंगरे,
पश्चिमेस :– जोगदंड
उत्तरेस:– विठ्ठल कदम,
दक्षिणेस :– पांदण रस्ता.


वरील चतुःसिमेच्या आतील शेत जमिनीवर कोणाचा काही हक्क, उजर, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, हक्क, आक्षेप ७ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह सादर करावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व शेतीची खरेदीखत करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन.

मार्फत
ॲड. शिवराज पाटील
नांदेड
मो. ९३७०३१०१२९

जाहीर प्रगटन देणार
विश्वनाथ राघोजीअप्पा
आमदरे पाटील
मो. क्र. ९९२२५४६३७३


**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


सामाजिक समतेचे प्रणेते
स्व.मा.आ.बळवंतराव अमृतराव चव्हाण
"ज्ञानतीर्थ" पुर्णाकृती पुतळा व
स्मारक अनावरण व नांदेड जिल्ह्याचे लोकनेते,
स्व. खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण
"वसंतस्मृती" पुर्णाकृती पुतळा व
स्मारक अनावरण
लोकार्पण सोहळा
"ज्ञानतीर्थ"
"वसंतस्मृती"
पूर्व प्राचार्य, गोविंदराव मेथे
शुभेच्छुक
● माधवराव पा. शिंदे (रोहीपिंपळगांव) ● ज्ञानेश्वर शिंदे ● गणेशराव कदम शेलगाव
● राजाराम पा. मेथे ● व्यंकटराव पा. मेथे ● संजय पा. मेथे ● डॉ. भगवान मेथे
● प्रा. डॉ. शिवाजी मेथे ● भास्कर पा. मेथे ● आनंद पा. मेथे ● डॉ. कैलाश मेथे
● इंजि. विलास मेथे ● श्रीराम पा. मेथे
व समस्त मेथे पाटील परिवार कापसी (खु.)
सौजन्य -
शंकरराव पाटील मेमोरियल एज्यूकेशन सोसायटी, नांदेड संचालित
● शंकर कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय (कला वाणिज्य विज्ञान) कौठा, नांदेड.
● वसंत ग्लोबल पब्लिक स्कूल अँण्ड जूनियर कॉलेज कापसी (गुंफा), ता.लोहा, जि.नांदेड.
● श्री संत बाळगीर महाराज वरिष्ठ महाविद्यालय (कला शाखा) कापसी (गुंफा), ता.लोहा, जि.नांदेड.
● यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत (बी.ए, बी. कॉम) कापसी (गुंफा) व कौठा, जि. नांदेड.
प्रा. तिरुपती मेथे


सामाजिक समतेचे प्रणेते
स्व.मा.आ.बळवंतराव अमृतराव चव्हाण
नांदेड जिल्ह्याचे लोकनेते
स्व.खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण
यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचा
लोकार्पण
सोहळा
निमित्य येणा-या सर्व मान्यवरांचे
हार्दिक स्वागत....
* स्वागतेच्छुक * मोरे पाटील परिवार टाकळीकर